सत्यमेव जयते

# उमेदवारांकरीता विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षा-२०२६ (Common Entrance Test) करीता अभ्यासक्रम व एकत्रित मार्गदर्शक सूचना

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय) पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई आणि महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या स्वायत्त संस्थांच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या सर्वंकष धोरणांतर्गत स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे लाभार्थी निवडीकरीता ऑनलाईन स्वरुपात सामायिक प्रवेश परीक्षा - २०२६ (Common Entrance Test) घेण्यात येणार आहे. सदर सामाईक प्रवेश परीक्षा करीता अभ्यासक्रम तसेच उमेदवारांसाठी महत्वाच्या मार्गदर्शक सूचना -**

## ❖ सामायिक प्रवेश परीक्षा २०२६ (Common Entrance Test) – अभ्यासक्रम व परीक्षांचे स्वरुप

### १. केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) -नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र करीता)

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Current events of national and international importance | | | | |
| 2 | History of India and Indian National Movement. | | | | |
| 3 | Indian and World Geography-Physical, Social, Economic Geography of India and the World. | | | | |
| 4 | Indian Polity and Governance-Constitution, Political System, Panchayati Raj, Public Policy, Rights Issues, etc. | | | | |
| 5 | Economic and Social Development – Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector Initiatives, etc. | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 6 | General issues on Environmental ecology, Biodiversity and Climate Change – that do not require subject specialization. | | | | |
| 7 | General Science | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी २ तास असेल.

### २. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा परीक्षा व महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Current events of national and international importance | | | | |
| 2 | History of India and Indian National Movement. | | | | |
| 3 | Indian and World Geography-Physical, Social, Economic Geography of India and the World. | | | | |
| 4 | Indian Polity and Governance-Constitution, Political System, Panchayati Raj, Public Policy, Rights Issues, etc. | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 5 | Economic and Social Development – Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector Initiatives, etc. | | | | |

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 6 | General issues on Environmental ecology, Biodiversity and Climate Change – that do not require subject specialization. | | | | |
| 7 | General Science | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी २ तास असेल.

### ३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - न्यायिक सेवा (CJJD & JMFC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | The Code of Criminal Procedure | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 2 | Constitution of India | | | | |
| 3 | The Civil Procedure Code | | | | |
| 4 | The Maharashtra Rent Control Act | | | | |
| 5 | The Indian Evidence Act | | | | |
| 6 | The Transfer of Property Act | | | | |
| 7 | The Specific Relief Act | | | | |
| 8 | The Law of Contract, The Sale of Goods Act and The Partnership Act | | | | |
| 9 | The Limitation Act | | | | |
| 10 | The Indian Penal Code | | | | |
| 11 | Bharatiya Nyaya Sanhita 2023 (BNS) | | | | |
| 12 | Bharatiya Nagarik Suraksha Sanhita 2023 (BNSS) | | | | |
| 13 | Bharatiya Saksha Adhiniyam 2023 (BSA) | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी २ तास असेल.

### ४. कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission) वर्ग ३ परीक्षा पूर्व प्रशिक्षण

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | General Intelligence and Reasoning | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 2 | General Awareness | | | | |
| 3 | Quantitative Aptitude | | | | |
| 4 | English Comprehension | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी १ तास असेल.

## ५. बँक (IBPS), रेल्वे, एलआयसी, नाबार्ड, एसबीआय, आरबीआय, आरआरबी इ. व तत्सम पदांकरीताच्या परीक्षा पूर्व प्रशिक्षण

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | English Language | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 2 | Numerical Ability | | | | |
| 3 | Reasoning Ability | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी १ तास असेल.

## ६. पोलीस/मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण

| अनु .क्र | अभ्यासक्रम | प्रश्न संख्या | परीक्षेचे मध्यम | परीक्षेचे स्वरुप | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंकगणित | १०० | मराठी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | १०० |
| २ | सामान्य ज्ञान व चालू धडामोडी | | | | |
| ३ | बुध्दीमत्ता चाचणी | | | | |
| ४ | मराठी व्याकरण | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी १.३० तास (९० मिनिटे) असेल.

## ७. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अराजपत्रित गट ब व गट क परीक्षा पूर्व प्रशिक्षण

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Current events of national and international especially Maharashtra | 100 | English & Marathi | Objective type (MCQ based) | 100 |
| 2 | History of Modern India especially Maharashtra. | | | | |
| 3 | Geography (With special study of geography of Maharashtra), Earth, world division, climate, latitude-longitude, types of land in Maharashtra, rainfall, major crops, cities, rivers, industries etc. | | | | |
| 4 | Indian Polity | | | | |
| 5 | Economic<br>Indian Economy – National Income, Agriculture, industries, foreign trade, banking, population, poverty & unemployment, currency and fiscal policy etc.<br>Government economy – Budget, accounting, auditing etc. | | | | |
| 6 | General Science – Physics, Chemistry, Zoology, Botany, Hygiene | | | | |
| 7 | Arithmetic -addition, subtraction, multiplication, division, decimal fraction and percentage etc. | | | | |
| 8 | Intelligence Test- | | | | |

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| | To test how quickly and accurately a candidate can think | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी १ तास असेल.

## ८. शिक्षक पात्रता परीक्षा (TET)

| Sr. No | Syllabus | Total No. of Que. | Medium of Exam | Nature of Paper | Total Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Child Development and Pedagogy: This section usually focuses on understanding the principles of child development and its relationship with teaching, learning, and assessment. | 100 | Marathi {The section of Language I (English) will be in English Language only} | Objective type (MCQ based) | 100 |
| 2 | Language I (English): This section assesses candidates' proficiency in English language and comprehension. | | | | |
| 3 | Language II (Marathi): Similar to Language I, this section tests candidates' proficiency in Marathi language and comprehension. | | | | |
| 4 | Mathematics: This section tests candidates' understanding of mathematical concepts taught in primary/upper primary/secondary classes. It covers topics such as numbers, arithmetic, geometry, etc. | | | | |
| 5 | Environmental Studies: This section focuses on concepts related to environmental science and social studies, relevant to primary/ upper primary/ secondary school teaching. | | | | |

- सदर सामायिक प्रवेश परीक्षा (CET) ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. व यामध्ये नकारात्मक गुणदान (Negative marking) लागू राहणार नाही.
- परीक्षेचा कालावधी २ तास असेल.

---

## ❖ परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाही बाबत -

१. परीक्षा केंद्रावर उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२. ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पोर्टल वरुन डाऊनलोड करून प्रिंट केलेले मुळ स्वरूपातील प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रवेश नाकारला जाईल.

३. **उमेदवारांची तपासणी/झडती (Frisking), ओळख पत्र पडताळणी करणे, सूचना देणे इ. स्वरूपाच्या कार्यवाहीसाठी परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान १.३० तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

४. परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन विहित वेळेच्या पुरेसे अगोदर आपल्या प्रवेश पत्रावर नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. परीक्षा कक्षामध्ये शेवटच्या प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

६. परीक्षा केंद्राच्या आवारामध्ये पालक, मित्र, नातेवाईक अथवा अन्य यांना प्रवेश अनुज्ञेय नाही.

७. परीक्षेच्या वेळी मद्य किंवा मादक आमली पदार्थाचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारावर उचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच सबंधित उमेदवाराला टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांच्या आयोजित पुढील सर्व परीक्षा निवडीकरीता प्रतिरोधीत करण्यात येईल.

८. **उमेदवाराचे परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक छायाचित्र व मजकूर सुस्पष्ट दिसेल असे मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

९. नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत) किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासबंधीचा दाखला परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०. **परीक्षा कक्षामध्ये फक्त काळ्या/निळ्या शाईचा पेन (केवळ ज्या परीक्षेला कच्चे काम (Rough work) करणे गरजेचे आहे अशा परीक्षेकरीता) मूळ वैध ओळखपत्र (मुद्दा क्र.८ मधील कोणतेही एक), ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पोर्टल वरुन डाऊनलोड करून प्रिंट केलेले प्रवेश प्रमाणपत्र, पाण्याची (पारदर्शक) बाटली, एवढेच साहित्य घेऊन जाण्यास परवानगी असेल.**

११.परवानगी नसलेले अन्य कोणतेही साहित्य (पाऊच, बॅग्स, पुस्तक इ.) परीक्षा कक्षामध्ये नेण्यास सक्त मनाई आहे.

१२. **स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, ब्लुटूथ, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, परिगणक (Calculator) इ. परीक्षा कक्षात, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास किंवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. उमेदवाराकडे नमूद कोणत्याही प्रकारची वस्तू आढळून आल्यास संबंधित उमेदवारास टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांच्या आयोजित पुढील सर्व परीक्षा निवडीकरीता प्रतिरोधीत करण्यात येईल.**

१३. परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साहित्य/साधन यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भात कोणत्याही नुकसानीस शासन/ स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समिती/ टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्था / परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

१४. **परीक्षा कालावधी संपल्यानंतर पर्यवेक्षकाच्या परवानगीशिवाय उमेदवाराला स्वत:चे आसन सोडता येणार नाही.**

१५. **प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रवेशासाठी निर्गमित करण्यात आले असून परीक्षेस प्रवेश दिला, म्हणून टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांनी उमेदवारी स्वीकारली, असा अर्थ होत नाही.**

१६. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समिती यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थितीत लेखनिकाची मदत व / किंवा भरपाई वेळ घेता येणार नाही.

---

## ❖ गैरप्रकार / गैरप्रकाराचे प्रयत्न प्रकरणी कारवाई -

स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश परीक्षा (CET) - २०२६ च्या अनुषंगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार/गैरकृत्य समजण्यात येईल-

१. अर्जात हेतूपुरस्कृत खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहित पद्धतीने वितरीत न करण्यात आलेले दाखले / कागदपत्रे सादर करणे.

२. सामायिक प्रवेश परीक्षा -२०२६ (CET) करीता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समिती किंवा टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस उदा. परीक्षा निरीक्षक, पर्यवेक्षक, सेवा पुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी इ. यांना त्रास देणे, धमकावणे अथवा शारीरिक इजा करणे अथवा तसा प्रयत्न करणे.

३. परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे, इतर उमेदवारांना धमकावणे इत्यादी प्रकारचे गैरवर्तन करणे.
४. परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंद्राच्या परिसरातील पायाभूत सुविधा/सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधूस करणे अथवा विद्रूप करण्याचा प्रयत्न करणे.
५. तोतयेगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे आणि / अथवा कोणत्याही तोतया व्यक्तीची मदत घेणे अथवा मदत घेण्याचा प्रयत्न करणे.
६. एखाद्या विशिष्ट निर्णयासाठी संघटितपणे अथवा असंघटीतपणे कोणत्याही माध्यमातून शासन / टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थावर दबाब आणणे अथवा दबाब आणण्याचा प्रयत्न करणे.
७. सामायिक प्रवेश परीक्षा -२०२६ (CET) च्या अनुषंगाने मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, आणि समाज माध्यमांद्वारे स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीवर किंवा टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांवर चुकीचे आरोप करणे, अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुद्ध निदर्शने, घोषणाबाजी करणे यांचा समावेश असेल.

---

## ❖ दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना

१. लेखनिक आणि / अथवा अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) सुविधा घेण्याकरीता लक्षणीय (Benchmark) दिव्यांगात्व किमान ४०% असलेल्या उमेदवाराने शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) धारण करणे आवश्यक आहे.

२. **लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या उमेदवाराने विहित करण्यात आलेले 'दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वतः उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (Certificate regarding physical limitation in an examination to write) धारण करणे आवश्यक आहे. परंतु खालील नमूद दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवारांना सदरचे प्रमाणपत्र अनिवार्य नाही.**

**(i) Blindness**
**(ii) Locomotor disability - both arms affected - BA**
**(iii) Cerebral palsy**

३. परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत घेण्याची आणि /अथवा अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) आवश्यकता असल्यास उमेदवारांनी सोबतच्या नमुन्यामध्ये **(प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२)** स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीकडे **दि.०९ सप्टेंबर, २०२६ पूर्वी** विनंती अर्ज करून लेखनिकाची आणि/अथवा मदत घेण्याची अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) आवश्यकता असल्याबाबत स्पष्ट मागणी करणे. विनंती अर्ज उमेवाराने ज्या प्रशिक्षण संस्थेच्या योजनेसाठी अर्ज केला आहे त्या संस्थेच्या ई-मेलवर पाठविण्यात यावा. ई-मेल खालील प्रमाणे -

- **टीआरटीआय – cevt1.trti@gmail.com**
- **बार्टी – mpscbarti.22@gmail.com**
- **सारथी – sarthipune@gmail.com**
- **आर्टी – esta.arti@gmail.com**
- **अमृत – amrut.gom@gmail.com**

४. **लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने परीक्षेच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.-**

(१) शासनाकडून कायमस्वरूपी दिव्यांगात्व किमान ४०% असल्याबाबत दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (Certificate of Disability)
(२) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वतः उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (Certificate regarding physical limitation in an examination to write)
(३) लेखनिकाचे मूळ आधार कार्ड (ओळख पडताळणीसाठी)

५. परीक्षेच्या वेळी पात्र दिव्यांग उमेदवारांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील
६. **लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी किंवा उमेदवार ज्या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता पात्र आहे, त्या परीक्षेच्या किमान शैक्षणिक पात्रता निकषापेक्षा जास्त नसावी.**
७. लेखनिकाने परीक्षेच्या वेळी आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
८. लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने सांगितलेले उत्तर निवडण्यास मदत करणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप/मार्गदर्शन/सूचना करू नये.
९. लेखनिकाने परीक्षा प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी इतर उमेदवारांशी/लेखनिकांशी चर्चा/गप्पा करू नये.
१०. लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही. अथवा इतर उमेदवारांशी एकग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
११.दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीच्या सर्व सूचना/नियम लागू राहतील.

वरील सर्व सूचनांचे तसेच परीक्षेच्या वेळी देण्यात येणाऱ्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अन्यथा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता कायमस्वरुपी अथवा ठराविक कालावधीसाठी प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

**प्रपत्र -१**

**दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज**
**(Blindness/Locomotor disability-both arm affected-BA/Cerebral palsy या दिव्यांग प्रकारातील उमेदवारांकरीता)**

**प्रति,**
**मा. अध्यक्ष,**
**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम**
**अंमलबजावणी व सनियंत्रण समिती**

**विषय: दिव्यांग उमेदवारास परीक्षेच्या वेळी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी उपलब्ध करून देण्याबाबत..**

**महोदय,**

मी ............................................................ (उमेदवाराचे नाव) दिव्यांग उमेदवार असून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. उमेदवारीसंदर्भात माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.-

१. सामयिक प्रवेश परीक्षेचे नाव : अ)....................................................................................................
ब)....................................................................................................
क)....................................................................................................
ड)....................................................................................................

२. प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) : ........................................................

३. प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेलडी : ..................................................................................

मी Blindness/Locomotor disability-both arm affected-BA/Cerebral palsy (लागू नसेल ते खोडावे) या दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवार असून **परीक्षेच्या वेळी स्वत: उत्तरे लिहण्यासाठी मी सक्षम नाही.** मला लेखनिकाची / लेखनिकाची व अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे. सदरच्या अर्जासोबत मी विहित दिव्यांगत्वाबाबतच्या सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा ..................................
दिनांक ..........................................

**(टीप - उमेदवाराने खालील कागदपत्रे एकत्रित स्वरुपात pdf करून ज्या संस्थेच्या (टीआरटीआय/बार्टी/सारथी/आर्टी/अमृत) योजनेकरीता अर्ज केला आहे, त्या संस्थेच्या ईमेलवर पाठवावा.)**

१. दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज (प्रपत्र -१)
२. लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत (Certificate regarding physical limitation in an examination to write) (अनिवार्य नाही)
३. लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र (नमुना क्र.- १)
४. अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (नमुना क्र-२)

**प्रपत्र -२**

**दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज**

**(Blindness/Locomotor disability-both arm affected-BA/Cerebral palsy ऐवजी इतर दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवारांकरीता)**

**प्रति,**

**मा. अध्यक्ष,**
**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम**
**अंमलबजावणी व सनियंत्रण समिती**

**विषय: दिव्यांग उमेदवारास परीक्षेच्या वेळी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी उपलब्ध करून देण्याबाबत..**

**महोदय,**

मी ..............................................................(उमेदवाराचे नाव) दिव्यांग उमेदवार असून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. उमेदवारीसंदर्भात माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.-

१. सामयिक प्रवेश परीक्षेचे नाव : अ)...........................................................................................
ब)...........................................................................................
क)...........................................................................................

२. प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) : ........................................................

३. प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेलडी : ...........................................................................

मी ....................................................................या दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवार असून **परीक्षेच्या वेळी स्वत: उत्तरे लिहण्यासाठी मी सक्षम नाही.** मला लेखनिकाची / लेखनिकाची व अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे. सदरच्या अर्जासोबत मी विहित दिव्यांगत्वाबाबतच्या सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्राची प्रत व व दिव्यांगत्वामुळे स्वतः उत्तरे लिहण्यासाठी सक्षम नसल्याने/उतर लिहण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे, परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची (Certificate regarding physical limitation in an examination to write) प्रत सोबत जोडली आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा ..................................
दिनांक ..........................................

**(टीप- उमेदवाराने खालील कागदपत्रे एकत्रित स्वरुपात pdf करून ज्या संस्थेच्या (टीआरटीआय/बार्टी/सारथी/आर्टी/अमृत) योजनेकरीता अर्ज केला आहे, त्या संस्थेच्या ईमेलवर पाठवावा.)**

१. दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज (प्रपत्र -२)
२. लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची (Certificate regarding physical limitation in an examination to write)
३. लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र (नमुना क्र.- १)
४. अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रमानपत्र (नमुना क्र-२)

**नमुना क्र.- १**

**लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र**

| |
|---|
| लेखनिकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो या ठिकाणी चिकटवावा. |

१. सामायिक प्रवेश परीक्षेचे नाव : अ)..............................................................................................

ब)..............................................................................................

क)..............................................................................................

ड)..............................................................................................

२. उमेदवाराचे नाव :..........................................................................................................

३. प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) :.....................................................

४. प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेलडी :.........................................................................................

५. लेखनिकाचे नाव :.........................................................................................

६. लेखनिकाचा जन्म दिनांक :.........................................

७. लेखनिकाचा आधार क्रमांक :....................................................

८. लेखनिकाचा भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) :..................................................

९. लेखनिकाची शैक्षणिक अर्हता :...............................................................

*** प्रमाणपत्र ***

आम्ही ...................................................................... (उमेदवाराचे नाव) सामायिक प्रवेश परीक्षेकरीता पात्र उमेदवार व .................................................................... (लेखनिकाचे नाव) उमेदवाराचा लेखनिक, खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करतो की,

१. उपरोक्त नमूद माहिती सत्य व बिनचूक आहे. दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना आम्ही वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.
२. दिव्यांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील सूचनांनुसार उमेदवाराला लेखनिकाची आवश्यकता आहे.
३. विहित दिव्यांगत्वाबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावर चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.
४. उमेदवार व लेखनिक एकाच परीक्षेकरीता उमेदवार नाहीत.
५. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह कालावधी घेण्याबाबत विहित निकषांची उमेदवाराकडून पूर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत:बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवाराकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची उमेदवारी रद्द करून उमेदवारास व लेखनिकास स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता कायमस्वरुपी प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा ..................................

लेखनिकाची स्वाक्षरी............................................

दिनांक .........................................          दिनांक......................................

## नमुना क्र.- २
## अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र

१. सामायिक प्रवेश परीक्षेचे नाव : अ)..................................................................................................

ब)..................................................................................................

क)..................................................................................................

ड)..................................................................................................

२. उमेदवाराचे नाव :.........................................................................................................

३. प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) :.......................................................

४. प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेलडी :..........................................................................................

*** प्रमाणपत्र ***

मी.................................................................................... (उमेदवाराचे नाव) खालीलप्रमाने प्रतिज्ञापत्र करतो की,

१. उपरोक्त नमूद माहिती सत्य व बिनचूक आहे. दिव्यांग उमेदवारांना अनुग्रह कालावधी (Compensatory Time) पुरविण्यासंदर्भात स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीने दिलेल्या सर्व सूचना मी वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.
२. विहित दिव्यांगत्वाबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावर चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.
३. उमेदवाराला नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा अनुग्रह वेळेसाठी (Compensatory Time) पात्र आहे, याची मला जाणीव आहे.
४. अनुग्रह वेळ (Compensatory Time) घेण्याबाबत विहित निकषांची उमेदवारांकडून पूर्तता होत नाही अथवा उमेदवाराने माहिती लपवून अनुग्रह वेळेचा (Compensatory Time) गैरफायदा घेतल्यास अथवा चुकीची / खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता कायमस्वरुपी प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा ...................................

दिनांक ............................................